# विद्यार्थ्यांची बुलेटस्थळाला भेट

**मुंबई :** मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पातील विक्रोळी येथील सी-२ पॅकेज बांधकाम साइटला ३० अभियांत्रिकी विद्यार्थ्यांनी भेट दिली. यावेळी प्रकल्पासाठी वापरलेल्या अत्याधुनिक नागरी अभियांत्रिकी पद्धती व पायाभूत सुविधा उभारणीचा विद्यार्थ्यांनी अनुभव घेतला.

गुजरातच्या पारूल विद्यापीठाच्या अभियांत्रिकी प्राध्यापकांसह तीस विद्यार्थ्यांच्या पथकाने विक्रोळी भेटीत शाफ्टची बांधणी समजून घेतली. पाहणीदरम्यान ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चरचे कार्यकारी उपाध्यक्ष संदीप देसाई, प्रकल्प संचालक सुनील त्यागी, मुख्य जोखीम अधिकारी अरुण देवरे उपस्थित होते. बुलेट ट्रेन प्रकल्प व्यवस्थापन, अभियांत्रिकी उत्कृष्टता आणि मोठ्या पायाभूत प्रकल्पांतील जोखीम व्यवस्थापन याबाबत या विद्यार्थ्यांना यावेळी माहिती देण्यात आली.